# भुयारी मेट्रो मार्गिकेवरील स्थानकांचे ब्रँडिंग

## एमएमआरसीकडून २२ स्थानकांसाठी निविदा

प्राथमिक टप्प्यात पाच स्थानकांचा समावेश

आता उर्वरित २२ स्थानकांच्या ब्रँडिंगची तयारी

**म. टा. खास प्रतिनिधी**

मुंबई : मेट्रो ३ ही भुयारी मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (एमएमआरसी) पाच स्थानकांच्या ब्रँडिंगद्वारे २१६ कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. कंपनीने त्यासाठी २२ स्थानकांच्या ब्रँडिंगसाठी निविदा काढली आहे.

मेट्रो ३ ही पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी राज्यातील पहिली भुयारी मार्गिका आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी हा दहा स्थानकांचा असून तो डिसेंबर २०२३पर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे. त्यासंबंधीची कामे झपाट्याने पूर्ण करण्याकडे कंपनीचा भर आहे. त्याचदरम्यान कंपनीने तिकीटबाह्य महसूल म्हणून या मार्गिकेवरील विविध स्थानकांच्या ब्रँडिंगचे काम हाती घेतले आहे.



मेट्रो ३ मार्गिकेवर एकूण २७ स्थानके आहेत. त्यापैकी पाच स्थानकांचे ब्रँडिंग कंपनीने पूर्ण केले आहेत. त्यामध्ये बीकेसी वगळता चर्चगेट, सीएसएमटी, हुतात्मा चौक व सिद्धीविनायक, ही स्थानके दुसऱ्या टप्प्यातील आहे. तीन कंपन्यांनी या पाच स्थानकांच्या ब्रँडिंगची बोली जिंकली आहे. याद्वारे कंपनीला मार्गिका सुरू झाल्यानंतर पाच वर्षांपर्यंत एकूण २१६ कोटी रुपये महसूल मिळणार आहे.

दरवर्षी पाच टक्के वाढीसह सरासरी ४० कोटी रुपयांचा महसूल या तीन कंपन्या पाच स्थानकांसाठी एमएमआरसीला देणार आहेत. आता उर्वरित २२ स्थानकांसाठी निविदा काढली आहे. १७ जुलै ही निविदेची अखेरची तारिख आहे.

### ... असे होईल ब्रँडिंग

- स्थानकाच्या नावापुढे कंपनीचे नाव
- कंपनीचा लोगो दर्शनी भागात
- ५ ते २० चौरस मीटरचे चटई क्षेत्र ब्रँडिंगसाठी
- स्थानक परिसरात एकूण ३०० चौरस मीटर जागा
- गाडीतील उद्घोषणेत कंपनीच्या नावाचा उच्चार